सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२००१

ठराव क्रमांक :- १६२

विषय क्रमांक :- १ (ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये मा.युवराज सतिश बावडेकर सदस्य, महानगरपालिका यांनी दिलेला प्रस्ताव ही सभा स्विकृत करुन घेवून खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

भारताच्या मा.राष्ट्रपती यांचे सांगली दौऱ्याचेवळी महानगरपालिकेच्या सांगली येथील जुन्या स्टेशन रोडवर असणारी खोकी महानगरपालिकेमार्फत हटविणेत आली होती. सदर खोकी धारकांचे पुनर्वसन जुन्या स्टेशन रोडवर जकात कार्यालया शेजारी नविन बांधणेत आलेल्या व्यापारी संकुलात करणेत आले आहे. सांगली नगरीचे आराध्य दैवत श्री गणेश आहे. सदर ठिकाणचे गाळेधारक यांनी मागणी केलेनुसार आणि समस्त भाविक, सांगलीकर नागरीक व महापालिका क्षेत्रातील नागरिकांच्या धार्मिक भावना विचारात घेवून, जुने स्टेशन चौकातील बांधणेत आलेले व्यापारी संकुलास "श्री गणेश मार्केट" असे नामकरण करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- Y. S Bawadekar ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.विजय ताबडे

महापौर,

मा. आयुक्तसो यांचेकडे सादर.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१०

ठराव क्रमांक :- १६३

विषय क्रमांक :- १(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये मा.'शेडजी सुबराव मोहिते, सदस्य महानगरपालिका यांनी दिलेला प्रस्ताव ही सभा स्विकृत करुन घेवून खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

कुपवाड येथील वॉर्ड क्र.६ मध्ये महापालिकेचे वतीने खुलेनाट्यगृह बांधणेत आले आहे. कुपवाड येथील नामवंत तमाशा सम्राट कै.बाबूराव कुपवाडकर यांनी तमाशा कले मध्ये त्यांच्या हयातीत संपूर्ण महाराष्ट्रभर किर्ती मिळविलेली होती. कुपवाड वासियांच्या त्यांचेवरील अफाट भावना लक्षात घेता वरील खुल्यानाट्यगृहास "कै.बाबूराव कुपवाडकर खुलेनाट्यगृह" असे नामकरण करणेस हि सभा मान्यता देत आहे.

सूचक :- 53 [signature]

ठराव सर्वानुमते मंजुर

[signature]

अनुमोदक [signature]

महापौर,

[signature]

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१०

ठराव क्रमांक :- १६४

विषय क्रमांक :- ७(ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये मा.'विजयकुमार धनपाल हावळे,सदस्य महानगरपालिका यांनी दिलेला प्रस्ताव ही सभा स्विकृत करुन घेवून खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका कार्यक्षेत्रातील सांगली शहरातील कोल्हापूर रोड १०० फुटी या रस्त्यास भुयारी गटार बांधणेबाबत मा.जिल्हा नियोजन समितीमध्ये चर्चा होवून १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करणेत आलेला होता. सदर कामाचे अंदाजपत्रक तात्काळ तयार करुन पाठविणेतबाबत इकडे कळविणेत आलेले होते. तथापि, अद्यापही सदर कामाचे अंदाजपत्रक मा.जिल्हा नियोजन समितीकडे पाठविणेत आलेली नाहीत. सदर कामाचे अंदाजपत्रक सत्वर न पाठविलेस मंजूर झालेला १ कोटी रुपयांचा निधी परत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरची बाब महापालिकेच्या आर्थिक हितासंबंधी असलेने सांगली शहरातील कोल्हापूर रोड १०० फुटी या रस्त्यास भुयारी गटार बांधणेकामी अलहिदा प्रस्ताव प्रशासनाने मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचेकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर

सूचक :-

अनुमोदक :-

मा. आयुक्तसो यांचेकडे सादर.
जलनिसारण अभियंता,

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१०

ठराव क्रमांक :- १६५

विषय क्रमांक :- १ (ज)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ३ "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खालील सदस्य यांनी दिलेले प्रस्ताव ही सभा स्विकृत करुन घेवून खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

१. मा.श्री.विजयकुमार धनपाल हाबळे , यांनी दिलेला प्रस्ताव :-

महापालिकेच्या वॉर्ड क्र.६७ च्या लगत इनाम धामणी या गावाच्या हद्दीत जवळजवळ १२८ कुटूंब राहत आहेत. सदर ठिकाणी पाण्याची पाईप लाईन नसल्याने, सदर कुटूंबांचे पाण्यापासून हाल होत असून, वणवण भटकावे लागत आहे. सदर ठिकाणचे नागरिक पाणी कनेक्शन घेणेस तयार असलेने, सदर ठिकाणी पाणी पुरवठ्याची पाईप लाईन टाकणेकामी आलेला प्रस्ताव.

२. मा.श्री.शितल जिनगोंडा पाटील , यांनी दिलेला प्रस्ताव :-

चिंतामणीनगर येथे केंद्र शासनाच्या निधीतून बांधणेत आलेल्या लोक आवास घरकुल योजनेत लोकांना लोकसहभागातून आर.सी.सी.घरे बांधून देणेत आली आहेत. सन २००२-०३ मध्ये झोपडपट्टीमध्ये बांधलेल्या या घरकुलांना सद्या महापालिका आर.सी.सी.दराने घरपट्टीची आकारणी केली जाते. वाल्मिकी आवास योजनेतून बांधणेत आलेल्या घरकुलांना जुन्या झोपडपट्टी दराने घरपट्टी आकारणी करणेत यावी यासाठी विचारार्थ व निर्णयार्थ आलेला प्रस्ताव.

३. मा.श्री.आनंदा मारुती देवमाने , यांनी दिलेला प्रस्ताव :-

महापालिकेच्या सन २००६-०७ या वर्षाचा जकात ठेका महापालिकेचे उत्पन्न वाढविणेसाठी व हित पाहणेसाठी श्री.साई ट्रेडिंग कंपनी या ठेकेदारास जकात ठेका देणेत आलेला होता. परंतु सदर ठेकेदाराने साधारण २० ते २५ पावती पुस्तकामधील जमा पावती पुस्तकेवरील असलेली रक्कम रोज किर्दीस जमा घेतलेली नाही. ही रक्कम अंदाजे ८ कोटीच्या आसपास आहे. सदर साई ट्रेडिंग कंपनीने अशाप्रकारे गैरव्यवहार करुन महापालिकेचे आर्थिक नुकसान करुन महापालिकेची फसवणूक केलेली आहे. ही बाब अत्यंत गंभीर असलेने, सदर साई ट्रेडिंग कंपनीवर फौजदारी स्वरुपाची कारवाई होणे आवश्यक आहे. पण अद्याप पर्यंत सदर प्रकारची कारवाई केलेली नाही. यामध्ये तत्कालीन आयुक्त यांनी दैनिक पुढारी या वृत्तपत्रामध्ये सदर गैर व्यवहारबद्दल फौजदारी करणेचे आश्वासन दिलेले होते. तरी आजअखेर साई ट्रेडिंग कंपनीवर कोणत्याही प्रकारची कारवाई करणेत आलेली नाही. सदरचा विषय हा महापालिकेच्या आर्थिक हित्याचा व अत्यंत महत्वाचा असलेने, सदर विषयावर चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

४. मा.श्री.हणमंतराव बंडूजी पवार , यांनी दिलेला प्रस्ताव :-

१. ६७ - अ पर्यावरण स्थितीचा वार्षिक अहवाल दरवर्षी प्रसिद्ध करणे आवश्यक आहे गेली ३ वर्ष प्रसिद्ध केलेला नाही याबाबत विचार विनिमय करणे.

२. २००२ साली सांगली शहरातील भुयारी गटर योजना टप्पा २ अंतर्गत ८.८९ कोटीचे काम पूर्ण झालेले आहे. उर्वरित १ कोटी रुपयाचे काम पूर्ण झालेस सांगली शहरातील विश्रामबाग ते कोल्हापूर रोड पर्यंतचा भाग भुयारी गटर योजनेने चालू होणार आहे याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे

३. खोकी पुनर्वसन अंतर्गत स्टेशन चौकातील बी.ओ.टी. धारक यांने अद्याप करारापमाणे २३५ खोर्काचे बांधणे गरजेचे आहे. अद्याप बांधलेली नाहीत. त्याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.

४. गुंठेवारी नियमितीकरण श्रेणीवाढ नियंत्रण याबाबतीत गुंठेवारी विभागाचे काम ठप्प आहे. त्याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.

... २ ..

पंचमुखी मारुती रोड व मारुती चौक ते राणी चौक डॉ.आंबेडकर रोड इत्यादी रोड वाहतुकीच्या दृष्टिने अपघाती रोड झाले आहेत. याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.

सांगली शहरातील विश्रामबाग ते कोल्हापूर रोड भोवे गटाराचा फार थोडा भाग जोडणे शिल्लक आहे. त्यामुळे १०० फुटी चौक या ठिकाणी सांडपाणी निर्गतीकरणाला मोठा प्रश्न निर्माण झला आहे. याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.

७. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतर्गत निधी येवून बराच कालावधी झला आहे. सुमारे १५ कोटी रुपयांचा विनियोग न झालेला निधी परत जाणार आहे. अशी वर्तमान पत्रामध्ये बातमी आहे. त्यावर चर्चा करुन निर्णय घेणे.

८. सांगली शहरातील विश्रामबाग पाण्याच्या टाकी खालील नाष्टा सेंटरला (नाममात्र) भाड्याने देणे निषीद्ध आहे असा म.जि.प्रा.चा अभिप्राय आलेला आहे. त्यावर चर्चा करुन निर्णय घेणे.

९. महाराष्ट्र जलसंपत्ती आयोग २००५ स्थापन झाला आहे. पाणी नियोजन नियंत्रण, दर निश्चिती याबाबत कायदा अंतिम करणेचे धोरण राज्य शासनाचे आहेत. सदरच्या कायद्यामध्ये पिण्याचे पाण्याचे दर ७.८ पट वाढणेची शक्यता आहे.

वरील मुद्दयाबाबत म.जि.प्रा.तर्फे व जलसंपत्ती आयोगातर्फे दि.२१/०१/२०१० रोजी यशदा मध्ये सुनावणी होणार आहे. या सुनावणीस महापालिके तर्फे भाग घेवून आपले मत मांडणेकामी चर्चा करुन निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव.

वरील प्रस्ताव स्विकृत करुन घेणेत येत असून, सभेमध्ये झाले चर्चेनुसार मान्यतेसाठी पुढील सभेच्या विषयपत्रिकेवर निर्णयासाठी सादर करणेकामी अहवाल अलहिदा सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका,